# गट उपासनेचे नियोजन व पुढारीपण करणारे आणि त्यांचे साहाय्यक यांच्यासाठी मार्गदर्शकत्तत्त्वे



देवाची प्रशंसा करणारी, विश्वासणाऱ्यांची उन्नती करणारी आणि शोधकांना येशूकडे आणणारी अशी उपासना सभा आयोजित करा. उपासनेचे पुढारीपण करणाऱ्यांनी प्रार्थना व देवाच्या वचनाचा अभ्यास याद्वारे स्वत:ची तयारी करावी. आपल्या सहकाऱ्यांच्या समवेत त्यांनी पुढील मार्गदर्शकतत्वांचा उपयोग करून उपासनेचे कार्यक्रम ठरवून पूर्वतयारी करावी:

**1. गटाच्या आकारमानानुसार उपासनेचे कार्यक्रम असावेत:**

- पुष्कळ वेळा मंडळ्यांची सुरुवात लहानशा एका गटाने होते. अशावेळी नवीन विश्वासणाऱ्यांच्या लहान गटाला साजेशा पद्धतीने उपासना सभा घ्यावी लागते.
- संपूर्ण मंडळीने केवळ बसून बघायचे आणि ऐकायचे असे न करता प्रत्येकाने सक्रीय सहभाग घेतला पाहिजे. खरे म्हणजे, मोठ्या गटापेक्षा लहान गटाला सक्रीय कृतीशील उपासना करणे अधिक सोपे आहे.
- देवाची स्तुती आराधना करतांना मंडळीने सुमधुर संगीत किंवा उपासनेचे पुढारीपण करणाऱ्यांचे कौशल्य यापेक्षा देवाविषयीच्या विचारांवर लक्ष केंद्रित करावे यासाठी साहाय्य करा.
- देवावर लक्ष केंद्रित करणारी गीते आणि उपासनेचे कार्यक्रम निवडा. लोक काय करतात आणि शिकतात यावर केंद्रित उपासनेचे कार्यक्रम असणे उपासनेच्या इतर पैलूसाठी चांगले असले तरी स्तुती करण्याच्या वेळेत ते योग्य नाही
- खर्चिक महागडी संगीत वाद्यांची गरज आहे आणि चांगल्या संगीतकारांचा शोध घेतला पाहिजे असा विचार करणे टाळा. यामुळे लोक स्तुती करण्याचे सोडून नुसतेच संगीत ऐकत बसतील लोकांनी देवाची प्रशंसा न करता गायक वादकांची वाहवा करणे टाळा.

**2. प्रसंग, तुमचे लोक, त्यांच्या सध्याच्या गरजा आणि स्थानिक रीतीपरंपरेनुसार उपासनेचे कार्यक्रम निवडा.**

- एकसूरीपणा टाळा, यामुळे पवित्र आत्माच्या पुढारीपणाखाली पुढे मेंढपाळांसाठीच्या प्रत्येक पौल तीमथ्य अभ्यासात उपासनेसाठी विविध कार्यक्रम निवडण्याकरिता सुचविले आहेत.
- सहकाऱ्यांना बरोबर घेऊन अगोदरच उपासनेच्या कार्यक्रमांचे प्रार्थना पूर्वक नियोजन करा.
- पुढारीपण करणाऱ्यांनी अन्य संस्कृतीमधून उपासनेची पद्धत आणणे आणि सध्याच्या गरजा व स्थानिक परंपरा यांना अनुरूप अशी उपासना कधी तरीच घेणे टाळावे.
- उपासनेला विश्वास नसणारे लोक उपस्थित असतील तर त्यांना ख्रिस्ताची ओळख होऊन त्याच्यावर विश्वास बसेल अशा कार्यक्रमांचा समावेश करा.
- पुढारीपण करणारे उपासनेचा प्रत्येक तपशील ठरवितात आणि शोधकांच्या तारणासाठी ही त्यात बदल करण्याची तयारी नसणे हे टाळा.
- इतर जण उपासनेचे पुढारीपण करत असतील तरीही उपासना कशी चालली आहे यावर एखाद्या वयस्कर व्यक्तीने लक्ष ठेवावे. वयस्कर पुरुषांनी सभेच्या काही भागांचे पुढारीपण तरुणांना व मुलांना दिले पाहिजे.

- स्त्रिया व तरुण लोक ह्यांना पाठाची तयारी करण्यास अधिक वेळ असला तरी त्यांना सभांवर वर्चस्व गाजविण्यास वाव देऊ नका. नाहीतर चांगल्या प्रकारे पुढारीपण करणाया लोकांच्या ते आड येतील.

**3. सर्व विश्वासणायांनी सक्रिय सहभाग घ्यावा.**

- सर्व वयोगटाच्या मुलांना सहभागी होऊ द्या. पौल–तीमथ्य मुलांच्या अभ्यासातील पवित्र शास्त्रातील कथावृत्तांत मेंढपाळांच्या आठवड्यातील विषयाला अनुरूप असाच असतो. त्यामुळे त्याचे नाट्यीकरण मुलांना मोठ्या माणसांसमोर सादर करता येईल. मुलांच्या अभ्यासात साधारणपणे स्तोत्रातील कवितांचा समावेश केलेला आहे, मुलांना ते म्हणून दाखवता येईल तसेच प्रश्न विचारता येतील. मुलांना थोडा किंवा संपूर्ण वेळ वेगळ्या खोलीत बसवून ठेवणे टाळा. त्यांना स्तुती व शिक्षण यात सहभागी करून घ्या.
- उपासनेचा बहुतेक वेळ मुख्य पुढायानेच घेणे टाळा. प्रत्येकाला एकमेकांची ओळख करून घेण्यास आणि एकमेकांवर प्रेम करण्यास वेळ द्या.
- सर्व शिकविण्याचे काम आणि सर्व प्रकल्पांचे व्यवस्थापन फक्त मोठ्या माणसांनीच करावयाचे टाळा, अन्यथा मोठी मुले कंटाळून लहान लहान खोड्या करीत बसतील. नव्या करारातील एकमेकांविषयीच्या आज्ञांचे पालन करण्यास उपासकांना साहाय्य करा.
- विश्वासणारे ख्रिस्तासाठी काय करीत आहेत त्याचा अहवाल मंडळीला सादर करण्याची संधी त्यांना द्या.
- दोन तीन वा चार जणांचे गट करून विश्वासणायांना एकत्र बोलून प्रार्थना करू द्या. यामुळे प्रत्येकाला प्रत्येकाचे ऐकण्याची, प्रश्न विचारण्याची, कार्यक्रम आखण्याची, इतरांना मार्गदर्शन करण्याची आणि प्रार्थना करण्याची संधी मिळते. दुखावलेल्या वा समस्यांनी ग्रासलेल्या लोकांबरोबर विश्वासणायांनी वेळ व्यतीत करावा. आजारी लोकांसाठी, हरविलेल्या लोकांसाठी तसेच एकमेकांसाठी प्रार्थना करा.
- प्रत्येक वेळी आखलेले कार्यक्रमच घेण्याचे टाळा. लोकांना एकमेकांची सहभागिता मिळावी आणि जवळून ओळख व्हावी यासाठी नियोजित कार्यक्रमांऐवजी पुरेसा वेळ द्या. त्यांना शांतपणे एकमेकांशी बोलून प्रार्थना करू द्या.
- हे सर्व करण्यासाठी गटाचा आकार लहान ठेवून नवे गट सुरू करा.
- बसण्याची व्यवस्था गोलाकार वर्तुळाकार असावी. विश्वासणायांनी मुलांसारखे एखाद्या वर्गात केवळ बसून एकमेकांची पाठ पाहावी हे करणे टाळा.
- एक अथवा दोन व्यक्तीनीच चर्चेवर वर्चस्व गाजवणे टाळा. चर्चेदरम्यान पुष्कळ बोलणाया किंवा तक्रारखोर लोकांना मेंढपाळांनी आवरावे. बडबड करणाया लोकांवरील लक्ष अन्यत्र वळविण्यासाठी पुढायांनी "अद्याप जे कोणी बोलले नसेल" त्यांनी उत्तर द्यावे, असे सांगावे. प्रत्येकाला बोलण्यात आणि मत मांडण्यात मोकळेपणा वाटावा.
- गटाचे लक्ष वेधून घेणे टाळा, काही लोक प्रत्येक सभेत काहीना काही तक्रार करीतच राहतात. आपण विपरित परिस्थितीचे खास बळी आहोत यात त्यांना आनंद वाटतो. कोणत्याही विषयावरील अंतिम शब्द हेकेखोरपणाने बोलणे काही जणांना अभिमानास्पद वाटते.

शास्त्रलेख नाट्यपूर्ण रीतीने वाचण्यास किंवा नाट्यीकरण करण्यास विश्वासणायांना शिकवा. शास्त्रातील अनेक कथावृत्तांतांमध्ये लोकांमधील संभाषण आहे. संवाद नसलेला भाग निवेदकाला वाचून दाखविता येईल. उदाहरणार्थ.

निवेदक उत्पत्ती 3 मधील भाग वाचतो.

एक पुरुष आदाम काय बोलतो व करतो ते वाचून अभिनय करतो.

एक स्त्री हव्वाबाईची भूमिका करते.

आणखी एक प्रौढ माणूस सैतानाची भूमिका करतो.

आणखी कोणी तरी देवाची वाणी बोलते.

**4. विश्वासूयांना शरीररूपी मंडळीत एकमेकांची प्रीतीने सेवा करता यावी यासाठी विविध आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग सुसंगतपणे पवित्र आत्म्याला करू द्या.**

- 1 करिंथ अध्याय 12 ते 13 ह्यामध्ये सांगितले आहे की विश्वासणायांनी प्रत्येकाला पवित्र आत्म्याने दिलेल्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करून एकमेकांशी प्रेमाने वागावे. मानवी शरीरातील अवयवांचे कार्य एकमेकांच्या संगतीने सुरू असते. तसे विश्वासणायांनीही वागावे. विविध आध्यात्मिक कृपादाने असणाया विश्वासणायांना एकमेकांपासून दूर ठेवणारे वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करू नका. कांही परंपरावादी मंडळ्यांमध्ये एकाच प्रकारचे आध्यात्मिक कृपादान असणारे विश्वासणारे एकत्र येऊन त्या कृपादानाच्या पद्धतीच्या सेवाकार्यात पारंगत होतात. तसेच इतर कृपादानांचा उपयोग करणायांशी त्यांचा फारसा संपर्क नसतो. हे असे करणे टाळा.
- आठवड्यातील कामाविषयी उपासनेमध्ये स्पष्ट उलगडा करा. काही कार्यक्रम त्या आठवड्यातील शिकविण्याच्या विषयाशी संबंधित असावेत. इतर कार्यक्रम अज्ञात गरजा आणि लोकांची सेवा करण्याची संधी ह्या गोष्टींशी निगडीत असावेत.
- मदतीची गरज असणारे आपले शेजारी व मित्रमंडळी विश्वासणायांनी सांगून त्यांची सेवा करण्यासाठी ते काय करणार हे स्पष्ट करावे.
- विश्वासणायांनी कार्यक्रम सुचवावेत व चर्चा करावी आणि कोण व केव्हा मदत करणार याविषयी नेमकी योजना आखावी. ह्या योजनांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल:

  एकमेकांसाठी आजारी हरवलेले व अशुद्ध आत्म्याने पछाडलेले यांच्यासाठी प्रार्थना करणे,

  सहभागिता,

  इतर मंडळ्यांबरोबर सहकार्य करणे,

  गुरजूंची सेवा करणे,

  कौटुंबिक भक्ती.
- नव्या करारातील ‘एकमेकांविषयीच्या’ आज्ञेंचे पालन करून मंडळीमध्ये आणि मंडळ्यामंळ्यांमध्ये प्रेमाची सहभागिता उभारा.

## नव्या करारातील एकमेकांविषयींच्या आज्ञा

**प्रीती:**

- एकमेकांवर प्रीती करा: योहान 13:34–35; 5:12,17; रोम 12:10; 1 थेस्सल 4:9; 1योहान 3:11,14,23; 4:7,11,12; 2 योहान 1:5; 1 पेत्र 1:22
- नियमशास्त्र परिपूर्ण करण्यासाठी एकमेकांवर प्रीती करा: रोम 13:8
- एकमेकांवरील प्रीती विपूल व्हावी: 2 थेस्सल 1:3
- एकमेकांवरील प्रीती वाढून विपूल व्हावी: 1 थेस्सल 3:12
- पापाची रास झाकून टाकण्यासाठी एकमेकांवर एकनिष्ठेने प्रीती करा: 1 पेत्र 4:8

**सहभागिता आणि समेट:**

- एकमेकांबरोबर सहभागिता ठेवा: 1 योहान 1:7
- एकमेकांना क्षमा करा: इफिस 3:13; 4:32; कलस्सै 3:13

- पवित्र चुंबनाने एकमेकांना सलाम करा (काही संस्कृतीमध्ये आंलीगन देतात): रोम 16:16; 1 करिंथ 16:20; 2 करिंथ 13:12; 1 पेत्र 5:14
- भाकरी मोडण्यासाठी एकमेकांची वाट पाहा: 1 करिंथ 11:33
- एकमेकांचे सहन करा: 1 करिंथ 12:26

**सेवा करा:**

- प्रत्येकाला जसे कृपादान मिळाले आहे तसे ते एकमेकांच्या कारणी लावा: 1 पेत्र 4:10
- एकमेकांची सेवा प्रीतीने करा: गलती. 5:13
- एकमेकांवर दया करा: 1 थेस्सल 5:15
- एकमेकांची काळजी घ्या: 1 करिंथ 12:25
- एकमेकांची ओझी वाहा: गलती 6:2
- नम्र सेवेचे चिन्ह म्हणून एकमेकांचे पाय धुवा: योहान 13:14
- एकमेकांबरोबर काम करा: 1 करिंथ 3:9; 2 करिंथ 6:1

**शिक्षण द्या:**

- एकमेकांना शिकवा: कलस्सै 3:16
- एकमेकांना बोध करा: रोम 15:14

**प्रोत्साहन द्या:**

- एकमेकांना प्रोत्साहन द्या: कलस्सै 3:16; इब्री 10:25
- एकमेकांना बोध करा: इब्री 3:13
- एकमेकांशी खरे बोला: इफिस 4:25
- एकमेकांसाठी आपले प्राण अर्पण करा: 1 योहान 3:16
- एकमेकांना प्रीती व सत्कर्मे करण्यास उत्तेजन द्या: इब्री 10:24

**प्रार्थना करा, कबूल करा व उन्नती करा:**

- एकमेकांसाठी प्रार्थना करा: याकोब 5:16
- एकमेकांजवळ आपली पातके कबूल करा: याकोब 5:16
- एकमेकांची उन्नती (बळकटी देणे, उभारणी करणे) करा: 1 थेस्सल 4:18 व 5:1,11
- प्रत्येकाने कोणी स्तोत्र गाऊन शिक्षण देऊन प्रकटीकरण सांगून, भाषेतून बोलून किंवा तिचा अर्थ सांगून एकमेकांची उन्नत्ती करा: 1 करिंथ 14:26
- एकत्रितपणे देवाचे गौरव करा: रोम 15:6

**नम्रपणे ऐक्य साधा:**

- एकमेकांचा आदर करा: रोम 12:10
- परस्पर एकचित्त असा: 2 करिंथ 13:11; रोम 12:16; 15:5
- एकमेकांना दोष देऊ नका: रोम 14:13
- एकमेकांविरुद्ध बोलू नका: याकोब 4:11; 5:9
- एकमेकांच्या अधीन राहा: इफिस 5:21
- एकमेकांची सेवा करण्यासाठी नम्रतारूपी कमरबंद बांधा: 1 पेत्र 5:5

**एकदिलाने राहाः**

- एकमेकांबद्दल सहनशीलता दाखवाः इफिस 4:2
- एकमेकांबरोबर शांतीने राहाः मत्तय 9:50
- एकमेकांचा आदर सत्कार कराः रोम 15:7; 1 पेत्र 4:9

**5. प्रत्येकाला ख्रिस्ताच्या समक्षतेची जाणीव पवित्र आत्म्याला करून देता येईल अशा पद्धतीने प्रभुभोजनाचा विधी साजरा करा.**

- नवीन मेंढपाळांसाठीच्या पौल तीमथ्य अभ्यासामध्ये प्रभुभोजनाची ओळख करून देणारे पवित्र शास्त्रातील विविध प्रेरणादायी उतारे दिले आहेत. प्रभुभोजनाच्या द्रव्यांचे वाटप करण्यापूर्वी विश्वासणायांना प्रार्थनेतून त्यांची पातके देवापाशी कबूल करण्यासाठी वेळ द्या. गुप्त पातके शांतपणे, न बोलता कबूल करा. आपण पातकांची कबुली का देतो असे कोणी विचारल्यास त्याला 1 करिंथ 11:27–31 आणि 1 योहान 1:7–10 ही वचने दाखवा. पातकांच्या कबुलीचे उदाहरण म्हणून स्तोत्र 51:1–10 मधील दावीदाची पापकबुलीची प्रार्थना वाचा.
- काही मंडळ्यांमध्ये प्रत्येकाला एक प्याला दिला जातो आणि विश्वासणारे द्राक्षारसात भाकरी बुडवितात. इतर मंडळ्या मात्र प्रत्येकाला एकेक पेला देतात. काही मंडळ्या वाईन ऐवजी द्राक्षाचा रस किंवा अन्य द्रव्यांचा उपायोग करतात. ह्या सर्व निरनिराळ्या पद्धती ग्राह्य आहेत.
- प्रभुभोजनाच्या विधीच्या अद्‌भुत रहस्याचा अनुभव न घेता तो एक शिक्षणाचा वेळ आहे असे समजणे टाळा.
- विश्वासणायांना प्रथम त्यांच्या पापांची कबूली देण्यास वेळ न देता घाईघाईने प्रभुभोजन उरकून टाकू नका.
- प्रभुभोजन म्हणजे जेवणाचा एक भाग आहे समजू असे नका, असे केल्याने ख्रिस्तरूपी शरीरातील भक्तीपूर्वक सहभाग संपुष्टात येईल (1 करिंथ 10:16). पौलाने ही चूक 1 करिंथ 11:20–34 मध्ये दुरूस्त केली आहे.

**6. विविध पद्धतीने स्तुती करू द्या.**

- विरोधी प्रतिकूल अधिकायांपासून संरक्षणाची गरज असल्यास विश्वासणायांना हलक्या आवाजात गाणी म्हणायला सांगा किंवा मनातल्या मनात उपकार स्तुती करा. यामध्ये अलिकडच्या दिवसात देवाने केलेल्या कार्याच्या साक्षी पवित्र शास्त्र वाचणे, पुढायांचेच शब्द पुन्हा उच्चारणे, कविता, नाटिका नृत्याविष्कार आणि न बोलता मनन चिंतन करणे या गोष्टींचा समावेश करता येईल.
- शक्यतो संगीतातून स्तुती करणे टाळा. कर्णमधूर संगीताद्वारे स्तुतीची उपासना करणे टाळा; कारण यामुळे प्रत्येकालाच गंभीरपणे स्तुतीची प्रार्थना करता येईलच असे नाही. सर्व वयोगटातील लोक आणि स्थानिक संस्कृती ह्यांना अनुरूप अशाच संगीत प्रकाराची गीते गा. विश्वासणायांना नवीन गाणी लिहिण्यास उत्तेजन द्या. फक्त इतर संस्कृतीमधून आणलेली गीतेच गाणे टाळा.

**7. उपकारस्तुती करतांना विश्वासणायांना देवाच्या धाक दाखवणाया समक्षतेची जाणीव होऊन त्यांना गंभीर होऊ द्या.**

गट उपासनेची नेमकी सुरुवात व शेवट यांचे योग्य नियोजन करा. पुढे उपासना सुरू करण्यासाठीच्या कार्यक्रमांची यादी दिली आहे:

- उपासनेची सुरुवात करण्यास उपयोगी ठरतील अशी स्तोत्रातील वचने किंवा इतर उतारे यांचा उपायोग कराः पुढे काही वचने दिलेली असून ती उपासनेच्या सुरुवातीला वाचता येतील:

| | | |
|---|---|---|
| स्तोत्र 8:1 | स्तोत्र 89:1 | स्तोत्र 123:1 |
| स्तोत्र 9:1-2 | स्तोत्र 95:1-3 | स्तोत्र 136:1-4 |
| स्तोत्र 18:1-2 | स्तोत्र 97:1 | स्तोत्र 147:1 |
| स्तोत्र 29:1-2 | स्तोत्र 98:1-2 | स्तोत्र 145:1-2 |
| स्तोत्र 34:1-3 | स्तोत्र 100 | स्तोत्र 148:1-2 |
| स्तोत्र 42:1 | स्तोत्र 104:1 | स्तोत्र149:1-4 |
| स्तोत्र 47:1-2 | स्तोत्र 105:1-3 | स्तोत्र 150 |
| स्तोत्र 66:1-4 | स्तोत्र 113:1-6 | हबक्कूक 2:20 |
| स्तोत्र 67:1-3 | स्तोत्र 103:1 | प्रकटी 7:9-12 |
| स्तोत्र 81:1 | स्तोत्र 111:1-3 | प्रकटी 2:7 |
| स्तोत्र 84:1-2 | स्तोत्र 117 | प्रकटी 22:6-7 |

- तुमची अंत:करणे उपासनेसाठी तयार करून ख्रिस्ताची समक्षता दाखवावी यासाठी पवित्र आत्म्याला विनंती करा.
- आपण खरोखरच उपासना केली आहे हे प्रत्येकाला माहीत असल्याची खात्री करा.
- अत्यंत अनौपचारिक आणि अगदी सलगीचे, परम पवित्र अशा देवाच्या समक्षतेची जाणीव करून देण्यात अपयशी ठरणारे उपासनेचे वातावरण असू नये.
- उपासनेला चालना देणाया आणखी काही गोष्टी पुढे दिल्या आहेत:
- आसपासच्या भागातील इतर मंडळ्या अधिक परंपरावादी असतील आणि त्या वेगळ्या पद्धतीने काही गोष्टी करत असतील तरीही त्यांच्यासाठी प्रार्थना करा.
- रागाने इतर मंडळ्या सोडणाया व त्यांच्यावर खूप टीका करणाया लोकांना हळूवारपणे चूक दाखवून दुरूस्त करा.
- टीकेचा सूर लावणारे पाळकांवर टीकेची झोड उठवणाया मेंढपाळांशी बोलणे टाळा; तसेच वेगळ्या पद्धतीने काही गोष्टी करणाया मंडळ्यांपासून दूर राहा.
- इतर मंडळ्यांचा विश्वास काय आहे वा त्या काय करतात याबद्दल रागाने संतापाने भावना, मत व्यक्त करणाया विश्वासणायांना टाळा.

**8. देवाला दान देण्याची संधी विश्वासणायांना द्या.**

- ख्रिस्ताच्या राज्याच्या वाढीसाठी आणि लोकांच्या गरजा पुरविण्यासाठी दानांचा उपयोग कसा केला जातो हे विश्वासणायांना समजू द्या. लहान गटांमध्ये काही विश्वासणारे इतरांना समजणार नाही अशा पद्धतीने दान देण्यास प्राधान्य देतात.
- पुढारी पैसे द्यावेत म्हणून पुढेपुढे करतात; दान देणे अशक्य असणायांना अडचणीत आणणे आणि दानाचा विनियोग कसा केला जातो हे कधीमधी सांगायाचे करणे टाळा.
- इतर विश्वासणायांच्या तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विश्वासणायांनी दान द्यावे अशी येशूची इच्छा आहे, पण त्या पैशातून पुढायांनी भौतिक सुखाच्या गोष्टी खरेदी करून स्वत:चा चरितार्थ चालविणे टाळा.
- आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी मंडळीने निवडलेल्या खजिनदाराची नियुक्ती करा.

**९. उन्नती करणाया गोष्टीच सभेत होतील याकडे लक्ष द्या.**

- प्रार्थना व नियोजन करण्याच्या वेळेत विश्वासणायांनी लोकांची बांधणी करण्यावर लक्ष केंद्रित करावे यासाठी नवीन कार्यक्रमांची भर घाला. उदाहरणार्थ, नवीन विश्वासणायांनी भर घालण्याचा प्रयत्न करणे, बाप्तिस्मा करणे, नव्या करारात सांगितल्याप्रमाणे कार्यक्रम सुरू करण्यात पुढाकार घेणे, नवीन मंडळ्या व गट सुरू करणे, नवीन पुढायांना प्रशिक्षण देणे, विश्वासणारे व मित्रमंडळीना आशीर्वाद देण्यासाठी भेट देण्याची योजना आखणे, पीडित लोकांची सेवा करण्यासाठी गट तयार करणे.
- आजारपण सैद्धांतिक मतभेद समाजातील पातक आणि सर्वसाधरण समस्या यासारख्या नकारात्मक गोष्टींवर बराचसा वेळ खर्च करणे टाळा. शरीररूपी मंडळीची उन्नती करणाया सकारात्मक बाबींवर चर्चा करण्यासाठीच नेहमी वेळ काढा.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net